म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५३४

# उत्तररात्र

## रॉय किणीकर



REFBK-0024761
REFBK-0024761

संदर्भ काव्य
२५३४
२७७६१
५४०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

12 FEB 1986
19 FEB 1986
16 MAR 1986
14 MAY 1986
5 MAY 1986
13 SEP 1987

( क्र. मा. पहा )
५०००-३-८४

# उत्तरार्ध

रॉय किणीकर

REFBK-0024761
REFBK-0024761

उत्तर रात्र / दुसरी आवृत्ती १९८५
श्रीमती सुशीला किणीकर

प्रकाशक: अनिल किणीकर श्रीशब्द प्रकाशन,
१६९१, सदाशिव पेठ, पुणे ४११ ० ३०

छाया मुद्रण: आनंद लाटकर
कॉम्प - प्रिंट कल्पना प्रा. लि., ४६१ / ४ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

छपाई: प्रकाश महाजन, महाजन प्रिंटिंग प्रेस,
अप्पा बळवंत चौक, पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ / रेखाटने: सुभाष अवचट

सहाय्यक: राजू देशपांडे **मूल्य रुपये २५/-**

आभार: पु. ल. देशपांडे, अरविंद गोखले, जयवंत दळवी, माधव मनोहर, **रणजित देसाई**, सुभाष अवचट, रविंद्र पिंगे, मोहन नगरकर, विजय कुवळेकर, रविंद्र घवी, सुधीर मोघे, सविता पारिजात, शरद कारखानीस, अशोक प्रभाकर डांगे, रमेश गोविंद वैद्य, विजय कारेकर, प्रकाश देवकुळे, ए. एम. खान, श्रीरंग संगोराम, अरुणा ढेरे, सतीश कामत

'उत्तर रात्र' हा कविता वाचनाचा प्रथम प्रयोग दि. ५ ऑक्टोबर १९८३ रोजी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, पुणे येथे झाला.

मूळ कल्पना: अनिल किणीकर

संकल्पना आणि संगीत: सुधीर मोघे

सहभाग: श्रीकांत मोघे, अजित सातभाई, अमृता सातभाई, वीणा देव, राहुल घोरपडे, अंजली माहुलीकर, मृणाल देव, अजित सोमण, अनिल किणीकर आणि सुधीर मोघे.

निर्मिती: अनिल किणीकर, मीना किणीकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठा...
२५३४
ग्रं. क्र. २८५६९
११।१।८६
संग्र. शाखा (स्थळ

जीवनयात्रा -

मृत्यू - ५ सप्टेंबर १९७८
जन्म - अंदाजे १९११.

१९४२ च्या चळवळीत भाग

आकाशवाणी मुंबई मराठी विभाग 'वाऱ्यावरची वरात', 'मेघदूत' इत्यादी Sound Magazines चे निर्मति व लेखक. अनेक एकांकिकांचे लेखन.

१९४४ ते १९५४ - 'दीपावली' वार्षिकाचे संस्थापक व संपादक.

१९६९ ते १९७१ - 'धरती' षण्मासिकाचे संपादक. 'चिमुकली दिवाळी', 'आरती', 'द्वारकामाई' ह्या नियतकालिकांचे संपादन व निर्मिती.

'धनुर्धारी', 'झंकार', 'यशवंत', 'नवयुग', 'मौज', 'लोकमान्य', 'विशाल महाराष्ट्र', 'यामिनी', 'ललित' इत्यादी नियतकालिकांतून चतुरस्त्र लेखन.

'भक्त पुंडलिक', 'नीरा और नंदा', 'पन्ना', 'ताई तेलीण', धन्यवाद', 'ललत', 'शिरडीचे श्री साईबाबा' आणि 'झाला महार पंढरीनाथ' ह्या चित्रपटांचे आणि काही लघुपटांचे कथा, पटकथा, संवाद लेखन.

'येग येग विठाबाई' (महाराष्ट्र सरकारचे प्रथम पारितोषिक), 'मंगळसूत्र', 'देव्हारा', 'नाटककार' 'खजिन्याची विहीर' इत्यादी नाट्यलेखन.

'रात्र' आणि 'उत्तररात्र' हे दोन कवितासंग्रह.



हा देह तुझा पण देहातीत तू कोण
हा देह तुझा पण देहाविण तू कोण
हा देह जन्मतो वाढत जातो सरतो
ना जन्म मरण ना देहातीत तो म्हणतो ॥

# 'कोलाज '

'रात्र ' आणि 'उत्तररात्र ' ह्या कवितासंग्रहातील रॉय किणीकरांच्या छोट्याशा कवितांमध्ये एक खोल गूढता झाकलेली जाणवते ह्यात नवल नाही. कारण मुळात रॉय किणीकरांचे व्यक्तिमत्त्वही तसंच गूढ होते. आयुष्यामधे त्यांनी अनेक क्षेत्रात मनस्वी संचार केला. अनेक गोष्टींचा तळ शोधला, पण चटकन् जाणवावा असा मागमूस मात्र कुठंच ठेवला नाही.

काळ्या जाकिटाच्या खिशात एक हात कोंबून कुठेही हिंडताना किणीकर दिसत. डोक्यावर पांढरे भरकटलेले केस, नेहरू कुडत्याच्या बाहीतून लोंबकळणारे हात, पांढऱ्या धोतराच्या सोग्यातून फुटून बाहेर पडलेले आणि तरातरा चालणारे असे पाय, झरझर रस्ता क्रॉस करून कोणत्यातरी कोपऱ्यावर तंबाखू खात ते कधी उभे असत, आणि भोवताली गर्दी असताना देखील ते जाताजाता काहीतरी चिठोऱ्यांवर लिहीत असत.

कधी ते सदाशिव पेठेतल्या घरात पुस्तकं-मासिकांच्या अस्ताव्यस्त पसरलेल्या ढिगाऱ्यात एकटेच उघडबंब बसलेले असत. कात्री घेऊन मासिकातील निरनिराळी छापील चित्रे कापून, खळीने चिकटवून कोलाज करीत असत. अनेक कागदांवर त्यांनी नाविन्यपूर्ण कोलाज तयार केलेली होती. कोलाजमध्ये प्रत्येक तुकड्यांचं स्वतःचं असं अस्तित्व कायम ठेऊन परत मोठ्या आशयाच्या चित्राचं एक अंग होणं हे अवघड असतं. त्यांच्या ह्या कविताही कोलाजसारख्याच आहेत. ज्या वयात माणसं अमृतांजन, मधुमेह आणि महागाई इत्यादी संदर्भात चर्चा करतात त्या वयात किणीकरांनी 'कोलाज ' ह्या नवीन अध्यायाला नव्या जोमाने सुरुवात केली होती. एक भला मोठा कॅनव्हॉस घेऊन एकच चित्र रंगवणाऱ्यापैकी त्यांचे व्यक्तिमत्त्व नव्हते. त्यापेक्षा छोट्या छोट्या मिनिएचर्समधूनच ते व्यक्त होत गेले.

आयुष्यभर रॉय किणीकर कुठंच बंदिस्त झाले नाहीत,सतत फकिरासारखे हिंडत राहिले. साहित्यातल्या भटक्या जमातीचं प्रतिनिधित्व करणाऱ्या किणीकरांनी संसारी असूनदेखील रूढार्थानं संसार केला नाही, लेखक असूनही सरसकट आपली लेखणी राबविली नाही. आणि संपादक असूनही संपादनाची ठरीव चाकोरी मळली नाही. कारण मुळातच हा चारचौघांसारखी चौकटी मांडणारा माणूस नव्हता, तर तो मांडलेल्या चौकटी मोडणारा माणूस होता. आखीव, व्यवहारी जगणे हे तर त्यांच्या स्वभावातच नव्हते आणि त्यामुळेच



अस्थिरतेचं त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर शिक्कामोर्तब झाले. वर्षामागून वर्ष फरफरटत चालली होती आणि आज इथे तर उद्या तिथे आणि परवा आणखी कुठे अशीच किणीकरांच्या आयुष्याची वाटचाल चालली होती.

'एस्टॅब्लिशमेंट' हा शब्दच किणीकरांच्या शब्दकोशांत नसावा. म्हणूनच आयुष्यातल्या कुठल्याच चौकटीत गुंतून पडणे त्यांना मानवण्यासारखे नव्हते. कुठे काही महिने, कुठे वर्ष- दोन वर्ष, कुठे चार वर्ष - बघताबघता खर्ची पडली. अगदी परवापरवापर्यंत हा प्रवास चालूच होता. कल्पना आणि वास्तव, संकल्प आणि सिद्धी ह्यातील खोल दरी मात्र शेवटपर्यंत जशीच्यातशीच होती.

मोठेपणाची कुठलीही खूण किणीकरांनी जवळ बाळगली नव्हती. एका फार निराळ्या आणि चांगल्या अर्थाने नामानिराळे राहणे हे त्यांच्या स्वभावातच होते. व्यवहारात यालाच 'विक्षिप्तपणाही' म्हणतात. ते निराळे होते यात शंका नाही, पण स्वतःच निराळेपणा मिरवण्याची संधी त्यांनी कधीही साधली नाही. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या व्यासपीठांपासून ते नेहमीच दूर राहिले. खरं म्हणजे सगळ्यांच्या जवळजवळ असण्याचा भास निर्माण करीत किणीकर सर्वांपासून दूरदूरच राहिले.

बहरलेल्या प्राजक्ताची फुले जशी अनासायास अलगद गळून पडतात तसं किणीकरांचं बोलणं होतं. त्या बोलण्यत प्रसन्नता होती, ताजेपणा होता, मिस्किलपणा होता. जीवनाच्या अटळपणाचं एक व्याकूळ भान होतं. तत्त्वचिंतन होतं पण विद्वत्तेचं, पांडित्याचं ओझं मात्र मुळीच नव्हतं. करून सवरून नामानिराळा अशी त्यांची दृष्टी होती. आणि एक विचित्र सिनिसिझिमही त्यांच्या बोलण्यात होता.

किणीकरांना फिरायला जाणं आवडायचं ते प्रामुख्यानं एस.टी. स्टँडवरच. रात्री-अपरात्री एस.टी. स्टँडवरच्या झकास वातावरणात बाकड्यावर बसून सिगरेट ओढताना ते पुस्तकं वाचीत असत. कित्येक वेळा ते स्टँडवर बसून गप्पा मारीत असत. बहुतेक वेळा गप्पा मारताना काहीतरी शोधत असल्यासारखे ते भिरीभिरी बघत असायचे. एस.टी. स्टँडबाबत ते म्हणायचे, "एस.टी. स्टँडसारखी सुंदर जागा नसते. कुठली कुठली किती प्रकारची माणसं येत असतात. आणि कशाकशासाठी कुठंकुठं जात असतात. किती असंख्य प्रकारचें भाव त्यांच्या चेहऱ्यावर असतात. आपण आपले कुठल्यातरी एखाद्या बाकड्यावर बसून बघत राहावं, फार काही बघायला मिळतं."

असेच एकदा आजच्या साहित्यावर आणि अपरिहार्यपणाने संतप्त साहित्यिकांवर गप्पा चालल्या होत्या. किणीकरांनी परखडपणाने सांगितले, 'नुसत्यां दाढ्या वाढवून फिरलं म्हणजे लेखनात संतप्तता आली का? संतप्तता वरवरची काय कामाची? आत संतप्त असली तर हे असले बाह्य देखावे करावे लागत नाहीत. खरं सांगू? अहो ह्या बहुतेकांची संतप्तता ही आर्थिक कारणाबद्दलची आहे. कमी पैसे मिळतात म्हणून हे संतप्त असतात! जास्त पैसे मिळायला लागले की यांची संतप्तता संपून जाते नि ते मग टापटिपीत राहायला लागतात. खरे संतप्त कवी फार थोडे. फारच थोडे. ज्ञानेश्वर खरे संतप्त कवी, तुकाराम खरे संतप्त कवी. त्यांचा संताप आतला होता- वरवरचा नव्हता.

किणीकरांना आर्थिक कर्ज होते. दारिद्र्याशी ते शेवटपर्यंत झगडत राहिले. त्यावर मात करण्यासाठी त्यांनी आपल्या डोक्यातून अनेक युक्त्या आणि कल्पना काढल्या. घरी मुलं उपाशी आहेत, त्यांच्या शाळेच्या फिया भरायच्या आहेत, कपडे करायचे आहेत एवढ्यासाठीच फसवेगिरीचा मिस्किलपणा त्यांनी केला. त्यातून संपत्ती गोळा केली नाही किंवा वैभव निर्माण केले नाही. 'दहा पंधरा रुपये द्या - गोष्ट लिहून देतो ' असे म्हणून संपूर्ण कथा ते सांगत असत. आणि ती कथा कागदावर उतरवून देणे मग त्यांना जमत नसे. कला आणि व्यवहार याची अशी सांगड त्यांना जमली नाही.

किणीकर कधीकधी वेड्या बाभळीच्या ठेंगण्या झाडासारखे वाटायचे. धुळीने भरलेल्या तापलेल्या रस्त्याकडेला दुर्लक्षित झालेली, केस पिंजारलेली वेडी बाभळ असते. तिला सावलीचा पत्ताच नसतो. तापलेला फुफाटा अंगावर घेत ती उभीच असते. पाणी टाकून तिला कोणी जोपासत नाही. आसपासच्या देखण्या झाडातही तिचं कौतुक नाही. काळ रापलेलं शरीराचं खोड जमिनीत रुतवून ती उभीच असते. बकऱ्या सोडल्या तर विशेष जवळ कोणी येत नाही. आलंच तर एखादं अडचणीत सापडलेलं कुत्रं तंगडी वर करून निघून जातं. वेड्या बाभळीचं रूप घेऊन किणीकर उभे राहिले. जमिनीत मुळं पक्की रोऊन जमिनीतल्या विश्वात ते शोध घेत फिरले. गर्दी नाही, पराभव नाही. चिंतन करायला एक शांत जागा त्यांनी शोधली. तिथे देणी मागणाऱ्यांना ठोठावण्यासाठी दारं माहिती नव्हती. शरीर वर ठेवून ते आत फिरले. आपले घर, आप्त त्यांनी तिथे शोधले. त्यांच्या डोक्यात कोणतेही गचपण जाणवलं नाही, आवश्यक तेवढंच त्यांनी ठेवलं आणि बाकी रद्दीच्या भावात विकून ते मोकळे झाले.

किणीकरांची जीवनयात्रा ही अशी अजब झाली. ह्या जीवनयात्रेच्या साधनेमध्ये खंड पडू नये म्हणून त्यांनी अनेक सोंगं घेतली. चित्रविचित्र मुखवटे घातले. ह्या यात्रेत ते अनेकांना अनेक प्रकारांनी भेटले. भंगड, विचारवंत, मित्र, बाप, नवरा, संपादक, लेखक आणि कलंदर - अशी त्यांची अनेक रूपं होती. मात्र ह्या साऱ्या भूमिका करताना ते त्यांच्या सूत्राशी पक्के होते. तसे नसते तर, रस्त्याने जाता जाता फकिराने मोरपिसांनी उधळलेल्या धूपाच्या फटकाऱ्यासारख्या त्यांच्या ह्या कविता आपल्यासमोर आल्या नसत्या. त्यांच्या कवितेचा आलेख बघितला तरी हेच जाणवते की हा जगावेगळा बहुरूपी होता.

सायंकाळ ते रात्र, रात्र ते उत्तररात्र ह्या प्रवासात किणीकर अनेक ठिकाणी हिंडले. ह्या अंधारातल्या प्रवासात ते कोठे जेवले, कोणत्या पायरीवर रात्र

काढली, कुठे पेपर विकले? कधी भुकेपोटी फुटाणे खाल्ले तर कधी उद्ध्वस्त संसार पाठीवर घेऊन बेवारशासारखे वणवण भटकत राहिले. त्यांच्या आयुष्यांतली खरी सकाळ त्यांच्या कवितांनी केली. ह्या रात्रीच्या पडद्यामागचे त्यांचे विश्व त्यांनी लिहिलेल्या तुकड्यातुकड्यावर प्रकट झाले.

कवितेची एक अत्यंत वेगळी अशी अलौकिक पातळी असते. कोणत्याही पिढीत ती आपली भूमिका टिकवणारी असते. दुःख, आनंद आणि उत्कटता या वेळेप्रमाणे वहात असतातच. भूक, दारिद्र्य आणि मृत्यू अखंड चालत आलेला असतो. येणाऱ्या प्रत्येक क्षणाची अस्वस्थता आणि नवीन क्षणाला सर्वार्थानं सामोरं जाणं हाही त्यातलाच एक भाग. इतिहासांतील हे एक सर्वव्यापी सूत्र आहे. अलिप्त राहून ह्या सूत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वच्छ असला की सुंदर कलाकृती निर्माण होते आणि तीच काळाच्या ओघात आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवू शकते.

'रात्र' आणि 'उत्तररात्र' वाचल्यावर 'ह्या माणसाने आणखी का नाही लिहिले' हा प्रश्न अनेकांच्या मनात उभा राहील. 'आणखी का नाही लिहिले?' अशी वाचकांच्या मनात हुरहूर लावून जाणं हे साहित्यिक यशाचं द्योतकच मानायला हवं. रॉय किणीकर जिथे यश-अपयश वगैरे शब्दच पोहोचू शकत नाहीत अशा घरट्यात जाऊन विसावले आहेत.





पूर्वरात्र एक वेदना घेऊन येते,
मध्यरात्र एक स्वप्न देऊन जाते,
आणि उत्तररात्र म्हणजे
जागर-यात्रेचे पुनः प्रस्थान।

# राम

दमलास, थांब ये, बैस, ठेव ते ओझे
हे नसे तुझे रे, नाही घर हे माझे
घे उचल, हा इथे भरला आहे पेला
जो गेला येथुनि नाहीं परतुन आला।।

या इथे कुणाला माहित नाहीं गाव
नाहींच विचारित कुणी कुणाला नाव
रे दिवस बुडाला अर्ध्या वाटेवरती
ये, पिऊन घे, ही रात्रीपुरती वसती।।

छे, अफाट गर्दी, कोलाहाल कल्लोळ
आश्चर्य, अरे बघ यांचा गेला तोल
ओरडती, रडती, उघडा उघडा दार
एकदां पिऊं द्या गाव राहिला दूर ।।

हा धनाढ्य पंडित कलावंत हा नेता
हा मुनी महात्मा कविश्रेष्ठ हा दाता
मागितले त्यांनी शेवटच्या घटकेला
पीणार कशाने ? फुटका त्यांचा पेला ।।



इतिहास घडविला त्यांची झाली कीर्ती
इतिहास तुडविला त्यांची देखिल कीर्ती
गहिवरला अश्रू कीर्ति - स्तंभावरला
पिंडास कावळा अजूनि नाही शिवला।।

या पाणवठ्यावर आले किति घट गेले
किति डुबडुबले अन् बुडले वाहुनि गेले
किति पडुनि राहिले तसेच घाटावरती
किति येतिल अजुनि नाही त्यांना गणती।।



मृद्गंध उमलला, आले मृग - नक्षत्र
चालली अवेळी ओलेती अपरात्र
वाकली जरा पिळताना ओला पदर
आतून जरासे हलले अर्धे दार।।

चांदणे सांडले गालावरती चिंब
पदरात झिरपले पुनवेचे प्रतिबिंब
दे भरूनि आणखी, पुन्हा भरू दे पेला
एकदाच आला क्षण गेला तो गेला।।

हा असा राहुदे असाच खाली पदर
हा असा राहुदे असाच ओला अधर
ओठात असू दे ओठ असे जुळलेले
डोळ्यात असू दे स्वप्न निळे भरलेले ।।

ही रात्र आजची पुन्हा न भेटायाचे
हे दार आतुनी पुन्हा न लागायाचे
मिटु नकोस डोळे अर्ध्यावर मिटलेले
पुसु नकोस ओघळ स्वप्नांचे फुटलेले ।।

काळोख खुळा अन् खुळीच काळी राणी
संकोच मावला मिठींत सुटली वेणी -
अंजिरी चिरी विस्कटे सुटे निरगाठ
ओठांत चुंबने भरली काठोकाठ।।

गुदमरली काजळकाठावरची धुंदी
कळवळली हिरवी तळटाचेची मेंदी
पाळणा झुले मांडीवर मिटले ओठ
पदरातुनि फिरली एक तान्हुली मूठ।।

ओठात अडकले चुंबन रुसले गाल
कोयरीत हिरवा चुडा विरघळे लाल
घालता उखाणा फणा रुपेरी खोल
अंकुरले अमृत ढळता नाभीकमळ।।

वितळली निळाई काळोखातिल आज
अन् अज्ञाताच्या कुशीत पडले बीज
अंकुरला चढला एकान्ताचा वेल
एकदाच येते या स्वप्नाला फूल।।

पसरुनी हात आभाळ खालती येई
उंचावुनि टाचा धरती चुंबन देई
जे दिसते नसुनी, असुनि दिसलें नाहीं
अंगाई गाते दिक्कालाची आई।।

येताना त्याने दार लाविले नाही
जाताना त्याने वळुनि पाहिले नाही
'येईन ' - म्हणाला, 'पाहिन वाट ' - म्हणाली
दारात अहिल्या शिळा होउनी बसली।।

ठेवुनी गळ्यावर हात दिला हातात
जळतात मनाची निरांजने नयनात
ओठात ठेवुनी ओठ मिळेना तृप्ती
आश्चर्य अहो, तेलाविण जळते पणती।।

राहिले तिथे ते तसेच अपुरे चित्र
राहिले तिथे ते तसेच अपुरे पत्र
घटिपात्र बुडाले, कलंडला नि : श्वास
पाखरू उडाले, पडला उलटा फास।।



देताना खांदा कुजबुजले ते चौघे
अष्टमात मंगळ, शनि राहू होते मागे
संसार असा हा, चला बिचारा सुटला
अन् गंगेकाठी कुंभ रिकामा फुटला।।

हें लिहिले नाटक, रचिले कोणी गीत
संवाद बसविले, दिले कुणी संगीत
अर्ध्यावर नाटक टाकुनि नायक गेला
शेवटचा पडदा अजूनि नाही पडला।।

घे शब्दकोश, ई - ईश्वर शोधुनि काढ
तो आत्मा दडला कुठल्या शब्दाआड
अर्थाला असते बंधन का शब्दांचे
कोसळून पडले इमले अक्षरतेचे।।

हे कुठूनि आले आषाढातिल मेघ?
का कुठे चालली मुंग्यांची ही रांग?
हे कसे चालते ऋतुचक्राचे चाक?
असते का उत्तर या प्रश्नांना एक।।

हे चित्र, शिल्प, ही वीणा आणि मृदुंग
येतात कोठुनी त्यातिल भावतरंग
हे हातावरच्या भाग्य नसे रेषांचे
आहे हे संचित, देणे भगवंताचे।।

आश्चर्य, कसें हें घडलें निमिषार्धात
जमिनीतुन पाउस पडला अस्मानात
बी पडले, आले अवकाशाचे रोप
वटवाघुळ झाला पिंपळ त्याचा बाप।

मध्यरात्र झाली, वारा सुटला गार
वेदना म्हणाली, मला नसे घरदार
वेदने, ये अशी जवळ, भरू हे पात्र
ये, पिऊन घे, ही तुझीच आहे रात्र।।

हा मार्ग एकला, नाही सोबत याला
जो गेला येथुनि नाही परतुनि आला
हा मार्ग कठिण, पण आहे रे कनवाळू
जरि पायाखाली रुते जराशी वाळू ।।

गंगेच्या काठी अखंड चाले यात्रा
वा ! गंमत जंमत भरली आहे जत्रा
जा, खेळा मांडुनि घर घरटे घरकूल
सावली - उन्हाचा आहे रे हा खेळ।।

कुंडली मांडुनी सांगे भविष्य - वक्ता
दिसतील तुला बघ दिवस सुखाचे आता
हां, ठेव दक्षणा, दैव तुझे रे मोठे
बांधशील वाडा, गाइगुराचे गोठे।।



कोसळला वाडा, ढासळले ते गोठे
गाडला खालती, पुन्हां न दिसला कोठे
बांधिले तिथे मुंग्यांनी वारुळ छान
मुंगी अन् माणुस - मोठे कोण लहान ।।

हे कालचक्र बघ फिरते उलटे सुलटे
फिरतात त्यातले तिथीमितींचे काटे
सूर्यचंद्र लंबक हलती रात्रंदिवस
हा काळ भोगतो जन्माचा वनवास ।।



हा देव असे करुणेचा सागर - सिंधू
हा आहे जीवन - अस्तित्वाचा बिंदू
शेवटीं सुचावे का हे तत्वज्ञान
बघ, गळून पडले हिरवे पिंपळपान।।

कळसावर ढळला विरक्त भैरव धूप
दरवळला उंबरठ्यावर मंजूळ भूप
रात्रंदिन चाले संकीर्तन भक्तीचे
जरि नसे उघडले दारही गाभाऱ्याचे।।

भरदार कुसुंबी काठ दाटली चोळी
येतसे अपूर्वा उषा सावळी भोळी
रांगोळी घालुन जाई दाराआड
रंगला इथे संध्येचा पश्चिम माड।।

रोमांचित झाले कितीक येथे युगलं
चुंबने दिली घेतली बिलगुनी जवळ
रंगली एकदा रेंगाळत अपरात्र
वाकले लाजुनी पदराखाली नेत्र।।

बेसावध पदराआड भेटले डोळे
अन् टोक जिभेचे अधरावरूनी फिरले
रंगला रक्तचंदनी पदर अन् पोत
पान्हवली स्वप्ने भरलेल्या पदरात॥

ते स्वप्न कालचे ठेव तिथे पायाशी
ते स्वप्न उद्याचे ठेव तिथेच उशाशी
हा भरला येथे स्वप्नांचा बाजार
घे हवे तुला ते, मिळते स्वप्न उधार॥

हा संसारी, स्वच्छंदी, हा संन्यासी
हा कैदी जाइल उद्या पहाटे फाशी
हा कर्मवीर, हा कुबेर, हा कंगाल
तळमळती स्वप्नासाठी डोळे लाल।।

चोरून चालला डोळ्यांचा कांगावा
मोडला जरासा उजवा, भरला डावा
डळमळली हंडी, फुटे दुधाचा काला
वाहून चालला वसुदेवाचा पेला।।

या इथे घेतली त्या दोघांनी शपथ
चुरगळले पदराआड जरासे हात
घातली मिठी आवळून दोन्ही बाहू
अडवून म्हणाली, नका नका ना जाऊ ।।

घेतली शपथ मावळत्या सूर्यफुलाची
घेतली शपथ सुकलेल्या निशिगंधाची
मोहाचे फुटले मोहळ संभोगार्थ
निर्माल्य प्रीतिचे झाले अश्रू तीर्थ ।।

ही प्रीती नाही दगडावरची रेघ
ती आहे चंचल पाण्यावरची आग
प्रीतीचा नसतो अक्षत अन्तरपाट
का वेड्या असते ती जन्माची गाठ।।

बहरले झाड मोहाचे - त्याला शाप
वेटाळुन बसले त्यावर कांचन - सर्प
फळ तोडु नको ते सर्प धरितसे दंश
अमृतास येता साय होतसे वीष।।

देहाचे मीलन, निसर्ग घडवी पाप
अज्ञात मनातिल प्रियकर असतो बाप
ती सप्तपदी - स्वप्नांचे झुंबर सात
शत - दीप पेटतिल हलता त्यातिल ज्योत ।।

उत्तरेस कलला शुक्र, शिरशिरे गात्र
वेदना म्हणाली, कधी संपते रात्र
काजवा उडे पंखावर घेउनि स्वप्न
भैरवी रंगली, भिजे चांदणे नग्न ।।

या इथून गेले यात्रिक अपरंपार
पाठीवर ओझे - छोटासा संसार
केति शिणले दमले म्हणता माझे माझे
वाकले मोडले, गेले टाकुनि ओझे।।

"मा निषाद " शब्दाआधी सुटला बाण
रतिरमल - विधीने लिहिले होते मरण
आकान्त अश्रुचा कल्पान्ताला भिडला
नव मानव तमसेकाठी जन्मा आला।।





वाटा हो साखर घरात आला एक
वाढा हो भाकर दारी आला एक
एकलाच आला सोबत होते दोघे
एकलाच गेला, चौघे उरले मागे।।

विरघळून गेले अनंत काळोखात
वितळले संपले धगधगत्या राखेत
चाकात मोडली चढणावरची गाडी
गंगेत वाहते अजुनि चिमकुली काडी।।

स्वर्गाची असते सोन्याची का माती
का व्यर्थ घालता नरकाची हो भीती
स्वर्गास असे नरकाचे आतुन दार
ते नाणे खोटे, खोटा तो बाजार।।

कल्पवृक्ष भारी गेला पहा चुलीत
श्रीलक्ष्मी घाली खानावळ चौकात
दुर्गंध पसरला अमृत सडले कुजले
स्वर्गात बिचारे देव निराश्रित झाले।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्र.)

दे लाथ, पेटवी कुजला हा देव्हारा
लागो न कुणाला देवाचाही वारा
थकलास बडवुनी कपाळ उंबरठ्याला
ना आई नाही बाप तुझ्या देवाला।।

कीर्तनात गातो - माझी मायं विठाई
फिरवितो तिला जणु बाजारातिल बाई
ते मंदिर फोडा, फोडुनि टाका मूर्ति
लखलाभ असो भडव्यांना ती अपकीर्ती।।



तो मृदुंग खोटा, खोटी वीणा टाळ
जाळून तुळस, हा गळयात घाली माळ
नाचवी पताका काढुनि यात्रा - दिंड
माउली होतसे याची रात्री रांड।।

हा दिवसा घेतो संताचा सन्मान
अंधार उतरता-होइल हा सैतान
बोंबलतो म्हणतो, सूर्याचा मी पणतू
सांडले वीर्य - वळवळला त्यातिल जन्तू।।



तोडून शृंखला ओरडला तो कैदी
सांडु द्या रक्त, रक्ताची चढु द्या धुंदी
नौबती झडू द्या रणांरणावर आता
पोलाद पेटु द्या, जाळा जुलमी सत्ता।।

भोगलीस सत्ता, सत्तेतुनं संपत्ती
उघडली मूठ, सत्तेची झाली माती
तुज लपावयाला आता जागा नाही
घर तुझे जळाले, जळशिल आता तूही।।

हा असाच ! याला जगावयाची भीती
बांधून राहतो काळोखाच्या भिंती
नागवाच येसी, नागवलो का म्हणसी
गंगेत बुडाली गंगेची रे कळशी ।।

या इथून गेली वाजत एक वरात
या इथेच रुतला रणगाडा चिखलात
या इथें भंगला भगवंताचा कळस
राखेतुन आली इथेच काळी तुळस ।।



या इथेच सुचली भगवंतांना गीता
या इथेच वाहुनि आली अभंग गाथा
प्रवरेत नाहली इथे न्हाणुली ओवी
अन् प्रदक्षिणा घातली विटेला डावी।।

ख्रिस्ताने नेला वाहुनिं येथे सूळ
सिध्दार्थ वदे, दु:खाला तृष्णा मूळ
जन्म आणि मृत्यु - देहाचे हे नृत्य
सौंदर्य जळे, सरणावर जळते सत्य।।

रात्र । ३२



खांद्यावर घेउ नको सोन्याचा सूळ
चार्वाक म्हणाला, पुनर्जन्म हें खुळ
देहाला कसले आहे पुण्य नि पाप
आत्म्यास भोगु द्या अमरत्वाचा शाप॥

जागृतीस पडले इथेच पहिले स्वप्न
माणूस म्हणाला, परब्रम्ह हे अन्न
गौतमास घडला इथेच साक्षात्कार
एकदांच जळते ज्योत, पुढें अंधार॥

दिसणार कसा भाकरीत लपला देव
भाकरी करपली, करपुनि गेला देव
मायावी स्वार्थी कृतघ्न आहे धरती
एकाला साखर, एकाच्या तोंडी माती

आभाळ फेडुनी रात्र नागवी आली
रस्त्यात कडेला चिंध्या चिवडित बसली
दुर्बीण लावुनी बघतो एक विधाता
नग्नता जळाली चिंध्या जळता जळता।।

नरमेध चालला, पहा पेटली सीमा
आहुती मागतो पिशाच्च अश्वत्थामा
अन्नसूक्त गाते यमरात्रीची अवस
मागती गिधाडें मंतरलेले मांस ।।

लागली कवाडे चारहि सीमान्ताची
चहुबाजुनि वाहे गंगा रक्ताश्रूंची
गर्भकोष फुटले, तुटले अनंत पाश
मातीत हरपले ममतेचे आकाश ।।

या इथें काढली निराश्रितांनी रात्र
पानावर पिवळ्या पडले भिक्षापात्र
तळतळला ओला गोळा भिंतीआड
चिर - मातृत्वावर पडला पहिला दगड ।।

अणु फुटला, उठला प्रलंयाग्नीचा डोंब
थडग्यातुन आला रांगत हिरवा कोंब
शास्त्रज्ञ खेळतो विज्ञानाचा खेळ
मृत्यूला नाही मरावयाला वेळ ।।

नरमेध चालला, पहा पेटली सीमा
आहुती मागतो पिशाच्च अश्वत्थामा
अन्नसूक्त गाते यमरात्रीची अवस
मागती गिधाडें मंतरलेले मांस।।

लागली कवाडे चारहि सीमान्ताची
चहुबाजुनि वाहे गंगा रक्ताश्रूंची
गर्भकोष फुटले, तुटले अनंत पाश
मातीत हरपले ममतेचे आकाश।।

या इथें काढली निराश्रितांनी रात्र
पानावर पिवळ्या पडले भिक्षापात्र
तळतळला ओला गोळा भिंतीआड
चिर - मातृत्वावर पडला पहिला दगड ।।

अणु फुटला, उठला प्रलयाग्नीचा डोंब
थडग्यातुन आला रांगत हिरवा कोंब
शास्त्रज्ञ खेळतो विज्ञानाचा खेळ
मृत्यूला नाही मरावयाला वेळ ।।

का नकाशात मावते निळे आभाळ
आणशील कोठुनि माप भराया काळ
घे भरून ओंजळ, म्हणते गंगामाई
माणूस उलट गंगेला काडी लावी।।

हे दक्षिण वाऱ्या, तिथे जरासा थांब
रे हिला पिऊ दे शेवटचा तो थेंब
मांडीवर काळोखाच्या ठेवुनि हात
तडतडली क्षणभर मावळतीची वात।।

आकाशदिवा थरथरला आकाशात
थांबली, संपली, विझली निश्चल ज्योत
चंदनी बाहुली गेली झोपायाला
पाळणा मातिचा लागे डोलायाला।।

रंगला डाव तो रंगित बावनपानी
हुकमाचे माझे पान चोरिले कोणी
छे, डाव मोडला संपायाच्या आत
झोळीत अडकला भगवंताचा हात।।

येणार, म्हणाला मृत्यू, भेटायाते
पांघरून स्वप्ने निद्रा जागत बसते
निद्रेस म्हणाला मृत्यु, आलो आई
स्वप्नांच्या दुलईत झोपला तोही।।

गहिवरले डोळे पाण्यांनी डबडबले
का उगा गाळसी व्यर्थ थेंब हे ओले
जातील उद्या ते अश्रु तुझे वाळून
जाणारे जातिल, पाहतील ना वळुन।।

गेले पैंगबर, येशू, बुद्धहि गेले
श्रीकृष्ण रामही गेले म्हणजे मेले
चुकणार नसे ते देवालाही मरण
वाचले कुणी का आभाळाचे पान।।

हे असेच लिहिणे, असेच असते गाणे
जरि नसले अश्रू असेच आहे रडणे
का असे, तसे का, नका विचारू आता
तो निघून गेला उत्तर देता देता।।

अश्रूंना नाही रूप नि कसला रंग
का व्यर्थ जुळविता ओवी आणि अभंग
जाणारा जातो, अनंत आहे काळ
तुटणार कधितरी मृत्यूची ती नाळ।।

म्हणु नकोस, तो साठाव्या वर्षी मेला
घेतली साठ वर्षे मरावयाला,
पाळणा हलवितो मृत्यू गाउनि गीत
सरपटे जन्म मरणाची टाकुनि कात।।

ओलांडुनि काळे, हिरवे, पिवळे रान
भरधाव धावतो श्वासावरला प्राण
कोंडिलेस जरि तू बांधुनि भिंती थोर
फोडून समाधी, पहा पळाला चोर।।

ही माता कान्ता कन्या लेकुरवाळी
हे सगेसोयरे जमले बघ भवताली
ओघळला अर्धा अश्रू गालावरला
हातात राहिला तसाच अर्धा पेला।।



देऊळ पाहिले दिसला नाहीं देव
ती नाव चालली, न दिसे कोठे गाव
घाटावर ठेवुनि यात्रिक गेला ग्रंथ
खळखळते यमुना, गंगा वाहे संथ।।

त्या तिथून गेली दिंडी आळंदीची
या इथे थांबली यात्रा अनामिकाची
चालली भिंत - आश्चर्य वाटले नाही
उघडेना ताटी - रडली मुक्ताबाई।।



संपली रात्र, संपले स्वप्नसंगीत
घुमटात पारवा घुमला एकान्तात
झोपला शेवटी अपर्ण वृक्षाखाली
दुमडून पंख पायाशी चिमणी बसली।।

पाउले उमटली आभाळावर येथे
संपले असे जे संपायाचे होते
कुणि लिहिल उद्या जे लिहिले नाही कोणी
जे लिहील ती होतील उद्यांची गाणी।।

हे कुठचे गाणे, असले कसले शब्द
गाऊन बघा ते, होइल जग नि : शब्द
अक्षरे निरक्षर फसली जरि शब्दात
जे अनिर्वाच्य ते अवतरते कंठात।।

पण लिहावयाचे लिहून झाले नाही
पण सांगायाचे सांगुनि झाले नाही
संपली कथा जी कुणी ऐकली नाही
संपली रात्र, वेदना संपली नाही।।

# उत्तरराग

घरट्यात फडफडे गडद निळे आभाळ
फांदीवर झुलते हिरवी पाऊल धूळ
कानावर आली अनंतातुनी हाक
विसरूनि पंख पाखरु उडाले एक।।

छे ! तुटला पतंग तुटला मांजा दोरा
अंधार उतरला सुटला वादळ वारा
तो पहा फाटला पतंग खाऊनि गोते
चिमुकले पीस बघ घरटे शोधित होते।।

फिरतसे काळजावरती करवत धार
पंखात घेत आकाश फिरतसे घार
थकलेले माती म्हणतसे पायदळीची
दाखवा वाट गर्भात परत जायाची ।।

पश्चिमेस कलला निळ्या पुलाचा खांब
ओघळले त्यावर नक्षत्रांचे थेंब
त्या पुलाखालुनी गेले उदंड पाणी
अन् वाहुनि गेली अज्ञातातील गाणी ।।



जे माझे होते माझे नाही उरले
नसताना ओळख श्वास सोबती झाले
छत कोसळले देवावर देवाघरचे
अन् जाळुनि कोळसे झाले उंबरठ्याचे।।

हा रात्रंदिन वडवानळ जळतो आहे
ही आग आजची राख उद्याची आहे
जा घरी आपुल्या परत सखे दमयंती
अन् ओली असु दे तुळशीखाली माती।।



नि : शब्द निरामय निश्चल आणि निवांत
निखळल्या पायऱ्या तुटला फुटला घाट
वाहती खडावा, अरे कुणाची छाटी
डोहावर जळते बघ सूर्याची कवटी।।

तू द्युती, देवयानी तू, तूं दमयंती
रागिणी पूर्वजन्माची जयजयवन्ती
ये जवळ, गाऊ ये शेवटचे हे गीत
अन् दिवा मालवू विझावयाच्या आत।।

स्मृतिगंध संहिता गाती ऋत्विज तीन
गांधार उशाशी होता धरुनी मौन
कंठात अडकली श्वासांची जपमाळ
भंगली समेवर ॐ काराची खोळ।।

माळावर इथेच उजाड विहिरीआड
वार्धक्य पांघरून बसले वेडे झाड
एकदाच गेली सुगंधी वाट इथून
निष्पर्ण मनाला डोळे फुटले साठ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

हा दोन घडीचा तंबूतिल रे खेळ
या विदूषकाला नाही रडाया वेळ
लावून मुखवटे नवा खेळ चल लावू
ठेवून सावल्या पडद्यामागे जाऊ।।

रंगीत मुखवटे मोहाचे तृप्तीचे
जयपरांजयाचे प्रीतीचे विरहाचे
हे सिंह वाघ हे हत्ती गेंडे घोडे
संपला खेळ अन् पुढे चालले गाडे।।

भेटणार नाही, शपथ नको तू घालू
डोळ्यांत कोंडला श्वास, नको तू बोलू
जा घरी सांग लाजून जराशी नीट
जाताना चुकली पाणवठ्याची वाट॥

संपेल कधी ही शोधायची हाव
फोडिले दगड दशलक्ष दिसेना देव
पसरतो शेवटी हात तुझ्या दारात
अश्रूत भिजावी विझताना ही ज्योत॥

देवळात नाही देव, देह देऊळ
का दगड घडविशी, तुला लागले खूळ
ये पहा इथे, आहे तूला पाहायाचे
गर्भातच उमलले दगडफूल प्राणाचे।।

आभाळ झिरपते भरलेल्या माठात
अन् निळा माठ बघ भरला आभाळात
आभाळ पलिकडे माठ फुटे हा इकडे
हा वेडा जमवी आभाळाचे तुकडे।।



आरशात पाहती कोण कुणाचे रूप
देहात दिसे का तुजला तुझे स्वरूप
बघ गेला पारा फुटला आरसा जाड
दिसले रे दिसले, 'अरुप' आरशाआड।।

ही मैत्री, प्रीती ही तर खोटी नाणी
बाजार भरविती गाऊन त्यांची गाणी
मदिराच असे ही विदग्ध आणि पवित्र
पेल्यात झिरपली तशीच अर्धी रात्र।।

या इथेच होती स्वप्ने मधुरात्रीची
या इथेच होती स्वप्ने उमलायाची
काळोख नेसुनी आला वादळवारा
ठेवुनि आठवण विरुनी गेल्या गारा।।

दाटल्या गोठल्या विस्मरणाच्या नाड्या
धावती रुळावर त्याच त्याच त्या गाड्या
ती शिटी, तो दिवा, सिग्नल पडतो तोच
जखम तीच, त्यावर माशा बसल्या त्याच।।

डबक्यात मनाच्या स्वप्नांचे शेवाळे
काठावर डोळे मिटुनि बसले बगळे
घालून शवासन बेडुक योगी आला
संभोग मागतो इवल्या मासोळीला।।

ही जुनीच माती नवी बाहुली व्याली
हे जुनेच कुंपण नवी मेंढरे व्याली
हे जुनेच ठिपके जुळता रांगोळीचे
उंदीर धावतील बिळात रेघोट्यांचे।।

मी मुंगी अन् वारूळ मी, मी वाल्मिकी
रामावर लिहिले नाटक मी एकांकि
रामास भेटला एक गुरू गोसावी
कामिनी पळविती कांचनमृग मायावी।।

रे कुणी दिला या पाषाणाला शाप
जा मंदिरातल्या मूर्तीचा हो बाप
पाषाण म्हणे मूर्तीला, माझ्या पोरा
सर्वज्ञ म्हणति तुज, मीच कसा रे कोरा।।

गर्भात उषेच्या फिरे तान्हुले स्वप्न
अन् कळवळले आकाशाचे अंत:करण
मखरातुन काळोखाच्या कुंती उठली
न्हाणुली कुमारी लेकुरवाळी झाली।।

देणार काय मी सूर्य उद्या जर आला
मागेल मला दे पाणी आंघोळीला
कोरड्या किनारी फिरे कल्पना वेडी
मृगजळात रुतली तिची बिचारी होडी।।

हे शून्य भयंकर घनता न दिसे त्याची
शून्याला एकच भीति असते अस्तित्वाची
प्रलयंकर शून्ये फिरती विश्वाभवती
अन् आकर्षुनी गिळती विश्वातिल वसती।।

गडगडून आले माथ्यावर आभाळ
थयथयती मंजुळ पायांतिल लय चाळ
लचकला स्वरांचा तुरा निळ्या डोळ्यात
इंगळी डसे इरकली मोरपंखात।।



हा ग्रंथ फाटला उरले मधले पान
ते अपूर्ण होते की, उरले विस्मरण
ती दोनच पाने : पहिले अन् शेवटचे
राहिले शेवटी तसेच वाचायाचे।।

ठेव ते जुने अन् जीर्ण शब्द बाजूला
घे शपथ पुन्हा हा लाव खडा कानाला
उखळात घालुनी हात, भुगा तो काढ
का चघळत फिरशी मेलेले ते हाड।।

मी व्यास वाल्मिकी ज्ञानाई मी लिहिली
पाण्यात परंतु ओवी वाहुनि गेली
जरी काच तडकली वात जळे आतील
मी जाईन जेथे चंद्र - सूर्य येतील।।



मी शब्द परंतू मूर्तिमंत तू मौन
मी पंख परंतू क्षितिजशून्य तू गगन
काजळेरेघेवर लिहिले गेले काही
( अन् ) मौनाची फुटली अधरावरती लाही।।

ही वाट वेगळी तुझी, नसे रे त्यांची
ही दुनिया आहे केवळ हसणाऱ्यांची
दाखवू नको रे डोळे ते भिजलेले
जा तुडवित काटे, रक्ताने जरी भरलेले।।

कानावर ठेवुनि हात, घालतो साद
घ्या पहा आणले तुमच्यासाठी शब्द
अन् सांगा उकलुनि देवाचे ते कोडे
देवळात गेला देव घालुनि माझे जोडे।।

जरी देव्हाऱ्यातून उठून गेले देव
मोडला जरी देव्हारा जपुनी ठेव
कापूर जळू दे, जळणे त्याचे काम
कोसळली पृथ्वी म्हणताना 'हे राम!'।।

घाटावर होती वाळत छाटी भगवी
दोरीवर होती वाळत साडी हिरवी
हा चिलीम फुंकित म्हणतो बघ संन्यासी
देवाला देईन त्या दोरीवर फाशी।।



ती माया ममता कृतज्ञता अन् प्रीती
बलिदान समर्पण श्रद्धा निष्ठा भक्ति
चल विसर शद्ब ते, भरला बघ हा पेला
अर्थशून्य शद्बांची दुनिया असे स्मशानशाळा।।

पण मद्य नव्हे हे मंतरलेले पाणी
अश्रूत तुझ्या विस्मृतिची लपली लेणी
ये मिटून जाऊ दंश जोवरी ओला
मृदगंध पांघरून घेऊ चंद्र उशाला।।



गजबजली बघ ही लाल दिव्यांची पेठ
घालती शीळ ते रंगवलेले ओठ
या लुटा, नग्न देहाचे मिळती दान
या इथेच झाला परमेश्वर पाषाण।।

ना उंबरठा, ना भिंत, इथे ना दार
कधि चूल पेटली नाही निघाला धूर
या इथे उगवली नाही हिरवी काडी
ही हीच असे रे, हीच तुझी वाडी।।

ओठात अडकले चुंबन रुसले गाल
कोयरीत हिरवा चुडा विरघळे लाल
घालता उखाणा फणा रुपेरी खोल
अंकुरले अमृत, ढळता नाभी - कमळ।।

मधुचुंबन म्हणजे क्षणभर धुंद विरक्ति
आलिंगन म्हणजे विरहाची आसक्ति
हे जीवन म्हणजे दीर्घ स्वप्न संभोग
हे जीवन म्हणजे मृगतृष्णेची आग।।

घुमटावर येऊन स्वप्नपाखरू बसले
पदरात पारवे घुमताना फडफडले
उसवली रात्र गर्भात सांडले स्वप्न
पापण्यात शिरले स्तन भरलेले दोन।।

वाजली शिटी अन् हलली दख्खन राणी
वाजली शिटी अन् हलले काजळ पाणी
वाजली कंकणे, पदर जरासा हलला
ओठावर हिरवा तीळ जरा विरघळला।।

भंगले इथे सिंहासन नर सम्राटांचे
स्तनमंडळ खचले उन्नत शृंगाराचे
या इथेच चढले प्रासादावर मजले
( अन्) उंदीर घुशीचे प्रसुतिमंदिर सजले।।

हे माझे घर, हा उंबरठाही माझा
कधि थकलो नाही, कितीक केल्या ये जा
शेवटची आशा एकच होती त्याची
डोक्याला लागो माती उंबरठ्याची।।

पिंजरा पोपटी लाल शीळही तीच
देऊळ आरती प्रदक्षिणाही त्याच
बाहुली तीच अन् तशीच ओली माती
मातीवर जळते त्या मातीची पणती।।

हातात न काही आता उरले कष्ट
पायात गुंतले पाय, अडकली वाट
अडकला श्वास ओठात, तडकली पाठ
अन् प्रेत प्रीतीचे उठून बसले ताठ।।

चालला पहा माडीवर मोडुनि पाय
गेल्यावर त्याचे सरते उरते काय
दिसतात पाऊले वाळुवरती दोन
अन् पुसून गेला फुटता लाट वरून।।

तू अमूर्त चिन्मय चिरंजीव वैदेही
देहात असुनही देहातिल मी नाही
प्रस्थान ठेविले यात्रा ही शेवटची
का वाट अडविशी अरे जाणाऱ्यांची।।

का कुणी पाहिले सत्याचे ते रूप
कुणी सांगितले रे असत्य म्हणजे पाप
सत्यार्थ जन्मते असत्य व्यभिचाराचे
फुलतात अग्निकण त्यातुन संघर्षाचे।।

रंगमंच सजला स्वर्ग जणू हा दुसरा
दिसला न कुठे दु:खाचा कणभर कचरा
सौंदर्य सुखाचा पडदा खाली पडला
दे लिहून नाटक, घे भरला आहे पेला।।

मिळविले परंतु एक मिळाले नाही
हरलो जरि येथे एक हरविले नाही
हरवले मिळाले काय, शेवटी सांग
जा उठा, घेतली आहे याने भांग।।

पाकळ्या गुलाबी सुकल्या थडग्यावरती
अन् कधीच विझली त्यावरची ती पणती
सांगतील का रे कुजलेल्या त्या अस्थी
त्या मध्यरात्रीच्या कथा परिकथा मस्ती।।

शहाण्या शब्दांनो हात जोडतो आता
कोषात जाउनी झोपा मारीत बाता
रस रूप गंध अन् स्पर्श पाहुणे आले
घर माझे नाही, त्यांचे आता झाले।।

संपली वही मोडले टोक टाकाचे
लिहिशील किती रे स्पंदनंक्षण श्वासांचे
घे हात उशाला खुशाल दे ताणून
देईल कोण तुज स्वप्न तुझे आणून।।



हा ऋषी काढतो का वाऱ्याची साल
का माकड म्हणते माझी आहे लाल
फुंकतो कवी का शब्दांचे नळकांडे
अरवता सूर्य का रात्र घालते अंडे।।

मी ध्वनी ऐकतो प्रतिध्वनीही मीच
का ज्योत जळे का प्रकाश, जळते काय
गारूड - मंत्र टाकता नाग का डोले
बघणारा बघतो विसरून आपला डोळे।।



मी पैज लाविली अमृत विकणाऱ्याशी
अन् वैर साधले जाणुनी यमधर्माशी
सत्यवान मेला नाही चाऊनि साप
अमृतास होता सावित्रीचा शाप।।

जा, बंद करा धर्माच्या पोकळ गप्पा
ओरडते पंगत, 'धर्म करा हो बाप्पा'
देवाचे भंजन हाच तुझा रे धर्म
दैवाचे भंजन धर्मातिल हे मर्म।।

अणु फुटला गोलार्धावर पृथ्वी हसते
पण श्वासाचा कण फोडशील का म्हणते
अणुहूनि धाकुटा वीर्याचा हा थेंब
आकाश निरंतर पृथ्वीपासून लांब।।

गेलीस समोरून आडवी वाट करून
गर्दीतुन बघशी पुन्हा पुन्हा का वळुन
ठेवून उरी पिचलेली हिरवी काच
भिरभिरली स्वप्ने सप्तपदीवर पाच।।

का सतार तुटता उठतो वाजवणारा
अन् ओल खुणाही ठेऊनि गेल्या गारा
बघ चाफा सुकला मावळला तो गंध
दे सोडुनि वेड्या शोधायाचा छंद।।

त्या छंदापायी वाट तुडविशी खोटी
मोडली वाट अन् मोडून गेली काठी
ती तुझीच माती जिथे टेकशी माथे
मांडीवर घेईन बाळाला ती म्हणते।।



थकलास तुडवुनी निवडुंगाचे रान
का वळून बघशी असे तुझे का कोण
घे दगड उशाला पांघर काळी माती
ह्या जमल्या मुंग्या शोकगीत त्या गाती।।

काव्याची हिरवी छाटी अंगावरती
छातीत दगड अन् कुऱ्हाड मानेवरती
गर्भातच घडते असे कसे हे थडगे
तो योगी लपला निवडुंगीच्या मागे।।



आभाळ उतरले तपोवनावर आज
गौतमीस आली कल्पांताची नीज
वारुळात शिरले परत वाल्मिकी का ते
भगवंत भेटले भगवी माती म्हणते।।

लागली समाधी आभाळाला आज
गौतमीस आली कृतार्थतेची नीज
बघ तपोवनावर पडले इंद्रधनुष्य
भगव्या मातीवर नाचे हिरवे हास्य।।

पेटविण्या चिलीम त्याची, आला सूर्य
उगवते धरित्री पडता त्याचे वीर्य
तो हात कटोरा आहे निरंजनाचा
त्रिभुवनात घुमला रुद्रनाद चिमट्याचा।।

ठोकरा खाऊनि मुर्दाड पाय हे थकले
पसरुनी हात, निर्लज्ज हात मरगळले
ती खोटी स्वप्ने पाहुनि डोळे सुजती
श्वानसूक्त गाती कुंभामधल्या अस्थी।।

जळल्यावर उरते एक शेवटी राख
ती फेक विडी तोंडातील काडी टाक
जळण्यातच आहे गंमत वेड्या मोठी
दिव्यता अमरता मायावी फसवी खोटी॥

ही जुनीच माती नवी बाहुली व्याली
अन् जुनेच कुंपण, नवी मेंढरे आली
या जुन्या नव्यावर कुणी बांधला पूल
या जुन्याच वाटा नवे उमटले पाऊल॥

विज्ञान आणखी ज्ञान नि तत्त्वज्ञान
त्याहून असे रे मोठे हे अज्ञान
हा बिंबाचा अन् प्रतिबिंबाचा खेळ
हे पडद्यापुढचे नाटक म्हणजे भूल।।

छायेला असते स्वतंत्र का अस्तित्व
वस्तूला नसते स्वतंत्रतेचे तत्त्व
हे विकती खोट्या बाजारातील रे वस्तू
ग्रंथातील वळवळणारे अक्षर जंतू।।

ही भूक शिकविते मागायाला भीक
अन् भीती म्हणते गळा काढुनी भुंक
भूक आणि भीती देवाची दैवाची
शिकविते ज्ञातही कोणी अज्ञाताची।।

संपला भोग रतिकंठ फुटे धरतीचा
फेडती कवचकुंडले नवस मातेचा
रांगता पुरेना अंगण आकाशाचे
पांगळे चाक बघ झाले मनोरथाचे।।



लागता चोर चाहूल पापणी मिटली
घुमटात आंधळी पाकोळी फडफडली
उसवला श्वास ओठात सांडले स्वप्न
अन् कोंभ दुधाचे त्यावर रुतले दोन।।



विरहतप्त घुमला डमरू शिवरात्रीचा
हा प्रदोष मंगल पर्वकाल सृजनाचा
भिल्लीण भाळली डमरु पडला खाली
(अन्) मदिरेतुन मदिराक्षी जन्मा आली।।



या इथेच पडलो होतो काल पिऊन
या इथेच पडले एक विलक्षण स्वप्न
पाहून रिकामे मद्याचे ते पात्र
उतरून पायऱ्या धावत आली रात्र।।

जे आहे येथे तेच खरे रे एक
जे नाही येथे नसे कुणा ठाऊक
स्मृति म्हणजे जगणे, विस्मृति म्हणजे मरणे
मी प्यालो म्हणुनि सुचले हे बडबडणे।।

हे मद्य नव्हे ही तृष्णा आहे अमर
हे मद्य नव्हे हे अमृत जाळील अधर
गति अगतिक होते जेव्हा भ्रमणामधली
घ्या मद्य दाखविल निर्मळ वाट निराळी।।

वाजले किती? वा! आहे बंद घड्याळ
मोजीत पाउले गेली संध्याकाळ
दारात उभी भिजलेली श्रावणरात्र
चल उशीर झाला पुन्हा भरू दे पात्र।।

इंद्रिये वाहुनि गेली ठेवुनि दंश
कोरड्या शुष्क देहाचे झाले कंस
खिडकीतून दिसले आकाशाचे घरटे
रुतलेले मोजिन जाऊनि तेथे काटे।।

वाकला देह वाकली इंद्रिये दाही
चिरतरुण राहिली देहातील वैदेही
मन नाचविते अन् नेसविते तिज लुगडी
मन नपुसक खेळे शृंगाराची फुगडी।।

वा ! पहा उडाली चित्रातील ती चिमणी
वा ! चंद्र पीतसे त्या डोहातील पाणी
छे ! कुणी दिले या मनास माझ्या पंख
शाश्वतास बसला अशाश्वताचा डंख ।।

मी कोण ? कोठला ? कुठे मला जायाचे ?
का एकच गाणे हेच तुला गायाचे
ते जुने प्रश्न आणि जुनाच त्यांचा वाण
प्राचीन तिरडीला नव्या सुतळीचा ताण ।।

घे प्रेत आपुले खांद्यावरचे खाली
बघ तुझ्या मागुनी कोल्हे कुत्री आली
दे दगड उशाला लोट नि काळी माती
या जमल्या मुंग्या शोकगीत हे गाती।।

उकरून जुने हा नवे बांधतो थडगे
पुटपुटतो मिटुनी डोळे, मोडुनि गुडघे
प्रार्थना कुणाची कशास माहीत नाही
मांडीवर शव अन् ओठावर अंगाई।।

मी मुक्त म्हणे हा वृक्षावरचा पक्षी
आभाळ एकटे आहे त्याला साक्षी
पण कुणी दिले हे आभाळाला पंख
शाश्वतास बसला अशाश्वताचा डंख।।

हे स्वरूप चिन्मय देहापुरते नसते
हे स्वरूप चिन्मय देह जाळता उरते
देहात वितळते कणकण स्वरूप जेव्हा
ना सरते उरते स्वरूप चिन्मय तेव्हा।।

"तू अमूर्त, ना जन्म ना मरण तुला
मी मूर्तिमंत पण गर्भातच विकलेला"
"अशरिरी तू, तुज देहधर्म ना कळले
बघ जन्मांतरिचे घाव घेत मी फसले"।।

का प्रवास म्हणतो टप्पा हा शेवटचा
वर्तुळात फिरतो कोष मध्यबिंदूचा
प्रारंभ नसे ना शेवट या रेषेला
प्रश्नातच असते उत्तर ज्याचे त्याला।।




एकटा परंतू गर्दीतील मी एक
गर्दीत चिरडले गेले माझे दु:ख
एकटा आज मी निर्जन एकांतात
द्या परत मला हो, हवे मला ते दु:ख।।

वाकला देह, वाळली इंद्रिये दाही
चिरतरुण राहिली देहातिल वैदेही
मन नागविते अन् नेसविते तिज लुगडी
मन नपुसक खेळे शृंगाराची फुगडी।।




जरि मनास फुटले पंख, अडकले पाय
बघ निरांजनावर येऊन बसला सूर्य
घे उडी पहा गौतमीस आला पूर
मन वाहुनि गेले देह राहिला दूर।।

विसरावे ऐसे जवळ असावे काही
मुक्त हस्त द्यावे असे असावे काही
गाळावे अश्रू दु:ख असावे खोल
कुणी देईल का मज त्या दु:खाची भूल।।




एकटा परंतू गर्दीतील मी एक
गर्दीत चिरडले गेले माझे दु:ख
एकटा आज मी निर्जन एकांतात
द्या परत मला हो, हवे मला ते दु:ख।।

वाकला देह, वाळली इंद्रिये दाही
चिरतरुण राहिली देहातिल वैदेही
मन नागविते अन् नेसविते तिज लुगडी
मन नपुसक खेळे शृंगाराची फुगडी।।




जरि मनास फुटले पंख, अडकले पाय
बघ निरांजनावर येऊन बसला सूर्य
घे उडी पहा गौतमीस आला पूर
मन वाहुनि गेले देह राहिला दूर।।

विसरावे ऐसे जवळ असावे काही
मुक्त हस्त द्यावे असे असावे काही
गाळावे अश्रू दु:ख असावे खोल
कुणी देईल का मज त्या दु:खाची भूल।।

पाहिले परंतू ओळख पटली नाही
ऐकले परंतू अर्थ न कळला काही
चाललो कुठे पायांना माहित नव्हते
झोपलो परंतू स्वप्न न माझे होते।।

ऋण नक्षत्रांचे असते आकाशाला
ऋण फळाफुलांचे असते या धरतीला
ऋण फेडायाचे राहुन माझे गेले
ऋण फेडायाला पुन : पाहिजे मेले।।

REFBK-0024761
REFBK-0024761

हा देह तुझा पण देहातिल तू कोण
हा देह तुझा पण देहाविण तू कोण
हा देह जन्मतो वाढत जातो सरतो
ना जन्म मरण ना देहातील तो म्हणतो।।

कोरून शिळेवर जन्ममृत्यूची वार्ता
जा ठेवा पणती त्या जागेवर आता
वाचील कुणीतरी होताना उत्खनन
म्हणतील कोण हा, कशास त्याचे स्मरण।।

ही युगायुगांची आहे अक्षर यात्रा
एकदाच भरते स्मशानातली जत्रा
खांद्यावर घेउनि शव फिरतो जन्म
राखेंत अश्रुला फुटला हिरवा कोंब।।